Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

# AJANTA

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL
MULTIDISCIPLINARY
QUARTERLY
RESEARCH JOURNAL

Volume - XI, Issue - II
April - June - 2022
MARATHI

Impact Factor / Indexing
2020 - 6.306
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २५ | भारत-चिन संबंध<br>प्रा. डॉ. बी. आर. तनपुरे | ११८-१२२ |
| २६ | पं. जवाहरलाल नेहरू यांचे परराष्ट्रीय धोरण<br>डॉ. रत्ना जवरास | १२३-१३० |
| २७ | भारताचे परराष्ट्र धोरण व बहुध्रुवीय जागतिक राजकारण: बदल आणि आव्हाने<br>डॉ. सी. एम. कहाळेकर | १३१-१३३ |
| २८ | कोविड-१९ आपत्ती व भारतीय लोकप्रशासनापुढील आव्हाने<br>डॉ. बी. आर. कतुरवार | १३४-१३७ |
| २९ | भारतीय परराष्ट्र धोरणाची मूलतत्वे आणि उद्दिष्टये<br>डॉ. दिलीपकुमार दगडु क्षीरसागर | १३८-१४५ |
| ३० | जवाहरलाल नेहरूंचे परराष्ट्र धोरण<br>डॉ. बिडवे टी. एस. | १४६-१५० |
| ३१ | परराष्ट्र धोरण आणि पर्यावरण संरक्षण<br>डॉ. प्यारेलाल सूर्यवंशी<br>प्रा. दत्तात्रय मुकूंदराव ढवारे | १५१-१५६ |
| ३२ | पंडित जवाहरलाल नेहरुंचे परराष्ट्र धोरण आणि आजची प्रासंगिकता<br>प्रा. डॉ. भालेराव संजय किशनराव | १५७-१६४ |
| ३३ | पंडित जवारलाल नेहरू यांचे परराष्ट्र विषयक धोरण<br>प्रा. डॉ. वसंत पांडुरंग सरवदे | १६५-१६९ |
| ३४ | परराष्ट्र धोरण व जागतिकीकरण आणि सद्यस्थिती<br>डॉ. रमेश वाघमारे | १७०-१७३ |
| ३५ | भारतीय परराष्ट्र धोरणाची तत्वे<br>डॉ. विष्णू नामदेव लांडे | १७४-१७६ |
| ३६ | भारताचे परराष्ट्रीय धोरण - मुलतत्वे व पंचशील तत्व<br>प्रा. डॉ. सुनीता प्रल्हाद मनवर | १७७-१७९ |
| ३७ | भारताच्या विदेशनीतीचे ७५ वर्ष : एक ऐतिहासिक अवलोकन<br>प्रा. डॉ. सचितानंद शंकर बिचेवार | १८०-१८४ |




Principal
A V Education Society's
Degloor College Degloor

# २८. कोविड-१९ आपत्ती व भारतीय लोकप्रशासनापुढील आव्हाने

डॉ. बी. आर. कतुरवार
लोकप्रशासन विभागप्रमुख, देगलूर महाविद्यालय, देगलूर, जि. नांदेड.

: आधुनिक शासनाने लोककल्याणकारी राज्याच्या (Welfare State) संकल्पनेचा स्वीकार केल्यामुळे जनतेच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी शासनास पर्यायाने लोकप्रशासनास पार पाडावी लागते. स्वातंत्र्यपूर्वकाळातील लोकप्रशासनाला जनतेकडून महसूल गोळा करणे, शांतता व सुव्यवस्था राखणे व न्यायदान करणे अशी मर्यादितच कामे करावी लागत होती. स्वातंत्र्यानंतर स्वातंत्र्य, समता, न्याय , बंधुता, धर्मनिरपेक्षता ,लोककल्याणकारी राज्य, समाजवाद इत्यादी आदर्श मानवी मुल्यांचा स्वीकार केल्यामुळे नागरिकांच्या जीविताचे रक्षण करण्यापासून ते देशाचा सर्वांगीण विकास करण्याची जबाबदारी शासनावर पर्यायाने लोकप्रशासनावर आली आहे.

त्यामुळे लोकप्रशासन व्यवस्था ही अधिक जबाबदार व उत्तरदायी बनविण्यात आले. संकटकाळात संकटग्रस्त नागरिकांना सर्वप्रथम मदतीला धावून जाण्याचे कार्य केवळ आणि केवळ लोकप्रशासन व्यवस्थाच करीत असते. जेंव्हा नागरिक मानव निर्मित अथवा कृत्रिम संकटात सापडतात त्यावेळी स्थानिक प्रशासन, महसूल प्रशासन, आरोग्य प्रशासन व पोलीस प्रशासन संकटग्रस्त लोकांना मदत करण्यासाठी धावून जात असते.

अलीकडेच कोविड-19 म्हणजेच कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या जागतिक संकटामुळे भारतासह जगातील सर्व देशात कठीण परिस्थिती निर्माण झाली आहे. कोरोनारूपी जागतिक महासंकट कालीन परिस्थितीत संपूर्ण देश कठीण परिस्थितीत वाटचाल करीत आहे. देशातील व सर्व घटक राज्यातील शासनव्यवस्था; धर्मव्यवस्था, प्रशासनव्यवस्था, व्यापारपेठ, अर्थव्यवस्था, समाजव्यवस्था, शिक्षणव्यवस्था इत्यादी महत्त्वपूर्ण संस्थावर प्रतिकूल परिणाम पडलेला दिसून येत आहे. कोरोना स्वरुपात उद्भवलेली ही महामारी तथा महासंकट मानव जातीच्या विकासावर प्रतिकूल परिणाम करीत आहे. या संकटावर विजय प्राप्त करण्यासाठी लोक प्रशासन चोवीस तास सेवा बजावीत आहे. अर्थात लोकप्रशासन चोवीस तास सेवा करीत असले तरी लोकप्रशासनातील अधिकारी व कर्मचारी वर्गाच्या जीवनावर कोरोनाचा परिणाम मोठ्याप्रमाणात पडलेला दिसून येत आहे. लॉकडाऊनच्या काळात मानवी संवेदना जपत लोकप्रशासन व्यवस्थेने कार्य केले आहे. वृद्ध, निराधार, कामगार जागतिक महामारीत अडचणीत आलेल्या कष्टकरी लोकांना जिल्ह्यातील अनेक सेवाभावी संस्था, प्रशासकीय अधिकारी, पोलीस व समाज सेवकाच्या मदतीने सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून मोफत धान्यवाटप,डब्बा वाटप, वैद्यकिय सेवा, निवारा इत्यादी सेवा सुविधा पुरविण्यात आले आहेत. अशा बिकट परिस्थितीतदेखील स्वत:च्या जीवाची पर्वा न करता चोवीस तास जनतेच्या सेवेला समर्पित झालेली प्रशासकीय यंत्रणा म्हणजे समग्र लोक प्रशासन होय.



Principal
A.V. Education Society's
Degloor College Degloor

६. असंवेदनशीलता

प्रशासन यंत्रणा आणि जनता यांच्यात मैत्रीपूर्ण संबंध असल्याशिवाय कोणतेही जनकल्याणाचे कार्य यशस्वी होऊ शकत नाही. भारतीय नोकरशाही ही असंवेदनशील यंत्रणा बनली आहे. प्रशासनाची कातडी गेंड्याच्या कातडीप्रमाणे असंवेदनशील बनली आहे. गेंड्याच्या कातडीचे वैशिष्ट्य म्हणजे सुईने नव्हे तर दाबनेने टोचले तरी त्यास संवेदना होत नाहीत. त्याप्रमाणे भारतीय नोकरशाहीला मानवी भाव भावना, इच्छा आकांक्षा या संदर्भात संवेदना कमी झाल्या आहेत.

७. औपचारिकता

प्रशासन यंत्रणेतील जवळपास सर्वच घटक वस्तुस्थितीला महत्व न देता केवळ कागदपत्र व औपचारिकतेला महत्व देत आहेत. कोणतीही शासकीय यंत्रणा असो त्यांनी लोकविश्वास प्राप्त करणे आवश्यक असते. परंतु योजना औपचारिकपणे राबविणे हेच आपले कार्य आहे, अशी नोकरदार वर्गाची मानसिकता बनली आहे. अधिकारी वर्ग काही वेळा नियमावर बोट ठेवून औपचारीकता पूर्ण करीत असतात. तर कधीकधी नियमाकडे दुर्लक्ष करून त्याचे उल्लंघन करीत असतात.अधिकारी कर्मचाऱ्याचे वर्तनात नीतिमूल्यांचा अभाव असलेले दिसून येत आहे . कित्येक ठिकाणी प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मनमानीला (त्रासाला) कंटाळून जनता त्यांच्या विरुद्ध आंदोलन करीत असते. प्रशासनातील अधिकारी वर्गाने जनतेचा सेवक म्हणून कार्य करावे, असे अपेक्षित आहे. पण हा वर्ग समाजापासून अलिप्त राहून व स्वतःला श्रेष्ठ समजवून वावरताना दिसून येतो. जनकल्याणाचा हेतू समोर ठेवून शासनकर्ते कल्याणकारी योजना आखत असतात परंतु त्याची अंमलबजावणी करणारी प्रशासन यंत्रणा अनेक दोषांनी खिळखिळी बनली आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी म्हणजेच नोकरशाहीमुक्त प्रशासन बनवण्यासाठी प्रशासकीय कार्यालयात स्वयंचलित साधन सामुग्रीचा वापर मोठ्या प्रमाणात करणे आवश्यक आहे. ई-प्रशासनाकडे म्हणजेच इलेक्ट्रॉनिक साधन सामुग्रीच्या मदतीने प्रशासन चालवण्याकडे भर देणे आवश्यक आहे. तसेच अधिकारी वर्गामध्ये नीतीमूल्याविषयी आस्था व कार्य संस्कृती विकसित करणे आवश्यक आहे.

संदर्भ

१. बोरा पारस व शिरशाट श्याम,लोकप्रशासन विद्या प्रकाशन औरंगाबाद, २०१३.
२. फडिया एवं फडिया,उच्चतर लोकप्रशासन साहित्यभवन प्रकाशन, आग्रा-२००१.
३. बंग के.आर., प्रशासकीय सिद्धांत, विद्या प्रकाशन औरंगाबाद, २००४.
४. दुबे अशोककुमार, २१ वी शताब्दी मे लोकप्रशासन, टाटा मॅकग्रा हिल पब्लिशिंग कंपनी, नवी दिल्ली. २०११
५. एम. लक्ष्मीकांत, लोकप्रशासन,टाटा मॅकग्रा-हील पब्लिशिंग कंपनी, नवी दिल्ली २००६
६. पोहेकर प्रीती, लोकप्रशासनाची मुलतत्वे, अरुणा प्रकाशन, लातूर -२००८.



Principal
A V Education Society's
Degloor College Degloor

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal "AJANTA". Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)
**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)
Cell No. : 9579260877, 9822620877, Ph. No. : (0240) 2400877

E-mail : ajanta6060@gmail.com, www.ajantaprakashan.com

**AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 6.306 (www.sjifactor.com)**

Principal
A V Education Society's
Degloor College Degloor